# संग्रामदेवता झाशीची राणी
## पोवाडा

धन्य धन्य संग्रामदेवता झाशीची राणी।
भारतीय क्रांतीयुद्धाची मर्दानी राणी।
शिवबाची भवानी अवतरे पाजण्या पाणी।
अलौकिक तेजाच पाणी।
गोऱ्यांनी केल पाणी पाणी।
पाणीदार राणीची ऐका अमर कहाणी ॥धृ॥

चाल: निजधामी गंगाधर गेले। आकाश फाटले। सर्वस्व गेले।
मांडीवर सोडून दत्तक पुत्रास। कंपनीन टाकल (झाशीचा)
वाकडया पावलास। स्वातंत्र्याचा गट्ट कराया घास ॥
विधवा काय राखील गादीला। त्यात ही अबला। मोका
चांगला। गट्ट करू झाशीऽच्या राज्यास। अनायासे तक्त
आले हातास। पसरल जाळ त्यांनी समयास ॥
गोऱ्यांनी घातला हैदोस। नाही पायपोस। पुरता धुडगूस।
तहनामा ठोकरला समयास। अजगर आवळी गळी
विळख्यास। झाशीला लावला त्यांनी गळफास ॥

चाल: राजानिष्ठ झाशी गोऱ्यास। नीतीची चाड कोणास ॥
दत्तक मान्य नाही कंपनीस। केल खालसा त्यांनी गादीस ॥
चाल: त्वेषाने बोले रणचंडी। मेरी झाँसी कभी नही दूंगी ॥
प्राणाहून प्रिय ही झाशी। जन्मात (कधी) देणार नाही कोणासी।

चाल: चवताळून बोले वाघीण। उपरे तुम्ही कोण। घेतसे आण।
स्वातंत्र्य आमच परत घेणार। सत्तावन साली देई ललकार।
पहिल्या क्रांतीचा भडका उडणार ॥

उठाव करण्यासाठी सज्ज सारे नरवीर

चाल: (क्रांतीयुद्ध पसरल साऱ्या देशभर)। गोळा झाले क्रांतीवीर।

तळहाती घेती शीर। निश्चय करती रणधीर। जुलमाचा

करण्या प्रतिकार। प्रतिकार। क्रांतीळा सुरू देशभर।।

हिंदू-मुस्लिम जमती बघा सारे एकजात। हातामधी घेऊन हात।

गोऱ्यांना दावती हात। ह्यूरोज पडळा विचारात। उपाय फक्त

एकची हातात। हातात। राणीचा करू निपात।।

चाल: राणीपुढे शिजेना डाळ। गोऱ्यांचा कर्दन काळ।।

रणचंडी दिसे विक्राळ। धगधगता क्रांतीचा जाळ।।

चाल: ऐकावी आता शेवटची संगरलीला।।

ग्वाल्हेरीस संग्रामदेवता दाविते लीला।।

चाल: ह्यूरोजन कावा काय केला। फौज पेरली जागोजागेला।

तोफखाना सज्ज ठोकण्याला। हुजर घोडेस्वाराला।

लपविल दऱ्या खोऱ्याला। मुंगी एव्हढी वाट नाही ठेवली

पळून जाण्याला।।

राणी कापे शत्रू सैन्याला। यमसदनी धाडल कैकाला।

पेशव्यांनी पळ काढला। सैन्यामंधी गोंधळ माजला।

स्वारांनी (गोऱ्यांनी) घेरल राणीला। ठार केल सुंदर दासीला।

शत्रूची फळी फोडण्याला। टाच मारली तिन घोड्याला।

नवा घोडा अडला नाल्याला। अडेलतट्टू काही केल्या

उचलेना टापेला।। दैवाच मांजर आड आलं क्रांतीयज्ञाला।।

एकेक करून कापला। तोच वार डोळ्यावर आला।

डावा डोळा खोबणीतून बाहेर लोंबू लागला।।

किर्चीचा दुसरा वार भेदून गेला छातीला।।

रक्तान देह माखला। पण सोडल नाही धीराला।

आचाट दावी शौर्याला।

उरलेला गोरा कापला पडली धरणीला।।

चाल: राणी बोले रामचंद बाबा। शेवटच सांगते बाबा।।

चाल: राणी बोले रामचंद्र बाबा । शेवटच मागण बाबा ॥
सांभाळा आता पोराला । वीरगती प्राप्त आम्हाला ॥
विटाळ नको गोऱ्यांचा मजला । त्यापूर्वी द्याव अग्नीला ॥
म्लानीन देह क्षीण झाला । गंगाजल घालती तोंडाला ॥

चाल: एक टक बघते पोराला । बघता बघता प्राण सोडला ।
गवताच्या चितेवर भडके क्रांतीची ज्वाला ॥
(तृण)

चाल: अलौकिक कथा शौर्याची । मर्द अबलेची । संग्रामदेवीची ।
ललामभुत क्रांतीदेवी जगतास । भारतीय करती
पुण्यस्मरणास । प्रभाकर (प्रल्हादसुत) वाही
आदर पुष्पास ॥

—•—

मिळवणी:
धन्य धन्य संग्रामदेवता झाशीची राणी ।
भारतीय क्रांतीयुद्धाची मर्दानी राणी ।
शिवबाची भवानी अवतरे पाजण्या पाणी ।
अलौकिक तेजाचं पाणी ।
गोऱ्यांनी केलं पाणी पाणी ।
पाणीदार राणीची अशी अमर कहाणी ॥ ध्रु ॥

[signature]

(ले: शाहीर प्रभाकर जामखेडकर,
कलाभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर
यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मुंबई दूरदर्शन साठी
सादर केला. दि. १८.६.१९९९.
(लेखनकाल: २४ एप्रिल १९९९ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी
मुंबई ४०० ०५१

चाल: राणी बोले रामचंद्र बाबा । शेवटच मागणं बाबा ।।
सांभाळा आता पोराला । वीरगती प्राप्त आम्हाला ।।
विटाळ नको गोऱ्यांचा भजला । त्यापूर्वी द्याव अग्नीला ।।
म्लानीन देह क्षीण झाला । गंगाजल घालती तोंडाला ।।

चाल: एक टक बघते पोराला । बघता बघता प्राण सोडला ।
गवताच्या चितेवर भडके क्रांतीची ज्वाला ।।
(तृण)

चाल: अलौकिक कथा शौर्याची । मर्द अबलेची । संग्रामदेवीची ।
ललामभुत क्रांतीदेवी जगतास । भारतीय करती
पुण्यस्मरणास । प्रभाकर (प्रल्हादसुत) वाही
आदर पुष्पास ।।

—•—

मिळवणी:
धन्य धन्य संग्रामदेवता झाशीची राणी ।
भारतीय क्रांतीयुद्धाची मर्दानी राणी ।
शिवबाची भवानी अवतरे पाजण्या पाणी ।
अलौकिक तेजाचं पाणी ।
गोऱ्यांनी केलं पाणी पाणी ।
पाणीदार राणीची अशी अमर कहाणी ।। ध्रु ।।

[illegible]

(ले: शाहीर प्रभाकर जामखेडकर,
कलाभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर
यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मुंबई दूरदर्शन साठी
सादर केला. दि. १८.६.१९९९.
(लेखनकाल: २४ एप्रिल १९९२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी
मुंबई ४०० ०५१